सिंचन व इतर प्रकल्पांसाठी भोगवटादार वर्ग-२/नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र. संकिर्ण-०४/२०१६/प्र.क्र.४९/अ-२**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक :- २६ मे, २०१६**

वाचा :- १) शासन निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक- १२.५.२०१५
२) शासन निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक- ३०.९.२०१५
३) शासन अधिसूचना क्र.जमीन-२०१६/प्र.क्र.८२/ज-१, दि.३१.०३.२०१६

**प्रस्तावना:-**

राज्यातील सिंचन व इतर प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना येत असलेल्या अडचणींच्या अनुषंगाने खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेण्याबाबत शासनाचे धोरण संदर्भाधीन क्र.१ व २ येथे नमूद शासन निर्णय दिनांक १२.५.२०१५ व दिनांक ३०.९.२०१५ अन्वये निश्चित करण्यात आले आहे. प्रकल्पांसाठी आवश्यक खाजगी जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेत असताना त्या आवश्यक जमिनींमध्ये भोगवटादार वर्ग-२ / नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनी आल्यास अशा जमिनी खरेदी करताना अडचणी येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली आहे. प्रकल्पांसाठी भोगवटादार वर्ग-२ / नियंत्रित सत्ता प्रकार धारणाधिकाराच्या जमिनी खरेदी करताना येणाऱ्या अडचणींमुळे अशा जमिनी संपादक संस्थांकडे हस्तांतरीत करण्यासाठी बराच कालावधी जात असल्याने प्रकल्पाचे काम सुरु होण्यास विलंब होतो. त्याअनुषंगाने, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वॉर रुममध्ये आयोजित बैठक दिनांक ३.२.२०१६ च्या इतिवृत्तानुसार भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराच्या जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करण्याबाबत धोरण निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदरहू धोरण निश्चितीबाबत कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत सर्वंकष विचार करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३७ अे ची पोट कलमे (१) व (२) खालील राज्य शासनाने प्रदान केलेल्या शासकीय जमीनी व नझूल जमीनींच्या विक्री किंवा हस्तांतरणास परवानगी देण्यासंदर्भातील अधिकार शासन अधिसूचना क्र. क्र.जमीन-२०१६/प्र.क्र.८२/ज-१, दि.३१.३.२०१६ नुसार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत. तसेच वतन निर्मुलन अधिनियम, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन

धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, पुनर्वसन अधिनियम इ. संदर्भातील संबंधीत अधिनियमातील तरतुदीन्वये जिल्हाधिकारी हे जमीन विक्री अथवा हस्तांतरण करण्यासंदर्भात परवानगी देण्यास सक्षम आहेत. सदर अधिनियम व त्याखालील नियमान्वये अशा हस्तांतरणापोटी आकारावयाचे नजराणा शुल्क/अधिमूल्य विहीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या विक्री अथवा हस्तांतरणाबाबतचे अधिकार व अशा हस्तांतरणापोटी आकारावयाची अनर्जित रक्कम याबाबत सर्वसाधारण अथवा विशेष आदेशान्वये जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

शासन/शासन अंगीकृत संस्था यांच्या प्रकल्पांसाठी आवश्यक खाजगी जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे संबंधित भूधारकाच्या सहमतीने थेट खरेदी पद्धतीने घेत असताना त्या आवश्यक जमिनींमध्ये भोगवटादार वर्ग-२/नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनी आल्यास अशा जमिनी खरेदी करताना, सरळ खरेदीने मोबदला निश्चितीसाठी शासन निर्णय क्र. संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२.५.२०१५ अन्वये गठीत करण्यात आलेली जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती मोबदल्याचा दर ठरवित असतानाच जिल्हाधिकारी यांनी संबंधित भोगवटादार वर्ग-२ / नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनीच्या धारकाची जमीन हस्तांतरणास संमती विचारात घेवून अशा जमिनीच्या धारणाधिकाराच्या स्वरुपात विविध संबंधित भूसुधार कायद्यातील या अनुषंगिक नजराणा मुल्य/अनर्जित रक्कम आकारण्या संबंधी तरतूद अथवा यथास्थिती महाराष्ट्र जमीन महसूल संहिते अन्वये शासनाने अशा नजराणा मुल्याबाबत/अनर्जित रक्कमेबाबत सर्वसाधारण अथवा विशेष आदेशान्वये दिलेले निदेश विचारात घेवून संबंधित भूधारकाकडून कोणताही स्वतंत्र अर्ज न घेता अशा जमिनीच्या हस्तांतरणास परवानगी देण्याविषयी औपचारीक आदेश त्याचवेळी त्यांच्या स्तरावरुन पारीत करावेत.

जिल्हाधिकारी यांनी असे औपचारीक आदेश पारीत करत असताना ज्या संबधित अधिनियमांतर्गत भोगवटादार वर्ग-२ किंवा नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनीबाबत आदेश पारीत करण्यात येत आहेत, तो अधिनियम, त्यातील तरतूद, नियम अथवा यथास्थिती या अनुषंगिक शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश यांचा उल्लेख करुन व अशा जमिनीच्या सर्व्हे/गट क्र. व क्षेत्रफळ यांचा आदेशामध्ये समावेश करुन त्यानुसार अशा जमिनींच्या हस्तांतरणास शासन मान्यता प्रदान करण्यासंदर्भात आदेश पारीत करण्यात येत आहेत, असे स्पष्टपणे आदेशामध्ये नमूद करणे आवश्यक राहील. तदनंतर, भोगवटादार वर्ग-२/नियंत्रित सत्ता प्रकार या धारणाधिकाराच्या जमिनींच्या संदर्भात संबंधित कायद्यानुसार किंवा प्रचलित शासन निर्णयानुसार शासनास येणे असणाऱ्या रक्कमा, संबंधित भूधारकांना अशा जमिनीच्या मोबदल्यापोटी देय होणाऱ्या मोबदल्यातून वजा करुन घेऊन उर्वरित रकमेचे प्रदान संबंधितांना करण्यात यावे.

०२. सदरहू शासन निर्णय महसूल व वन विभाग (महसूल शाखा) यांचे सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र. अनौ.स. ४३/ज-१, दिनांक २३.५.२०१६ च्या अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र २०१६०५२७१२१०११२३१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2016.05.27 12:14:35 +05'30'

**(सु.कि.गावडे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मुंबई
३) मा.मंत्री (महसूल)यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
७) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
९) अपर मुख्य सचिव(वित्त) यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०) प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
११) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
१२) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
१३) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
१४) सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) संचालक, नगररचना, पुणे
१८) सर्व अधिक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम/जलसंपदा)
१९) सर्व जिल्हा सरकारी वकील
२०) निवडनस्ती (अ-२)